**<u>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३,महापालिका मार्ग,मुंबई-१.</u>**

**आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे या योजनेतील पदे भरणेबाबत.**

**<u>जाहिरात</u>**

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.औप्रसं/१२०४/प्र.क्र. /२३/का-२, दि.२३ ऑगस्ट २००४ मधील **आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे** (प्रोजेक्ट युनाईट)या योजनेतील राज्यातील आदिवासी संस्थातील खालील पदे ठोक मानधनावर कंत्राटी पध्दतीने भरण्याकरिता विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**(१) पदांचा तपशिल**

| अ.क. | पदनाम | पदांची संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण व पदांची संख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | प्रकल्प अधिकारी रु.८०००/- | **८** | महिला | -- | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | ३ |
| | | | माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | | सर्वसाधारण | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | १ | १ | ४ |
| २ | अंश. सहाय्यक अधिव्याख्याता रु.४०००/- | **१२** | महिला | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | ३ |
| | | | अपंग | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | | | प्रकल्प/भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| | | | माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ | ५ |
| | | | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | २ |
| ३ | गणित /चित्रकला निदेशक रु.५५००/- | **९** | महिला | -- | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | ३ |
| | | | अपंग | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | | प्रकल्प/भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | | | माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |
| | | | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| ४ | वरिष्ठ लिपिक तथा भांडारपाल रु.४०००/- | **७** | महिला | -- | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | ३ |
| | | | माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | | सर्वसाधारण | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ३ |
| ५ | **शिल्प निदेशकरु.५५००/-** | | | | | | | | | | | | |
| | १) विजतंत्री | **९** | महिला | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | २ | ३ |
| | | | माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ३ |
| | | | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |
| | २) ड्रायव्हर कम मेकॅनिक | **२४** | प्रकल्प/भुकंपग्रस्त | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ३ |
| | | | माजी सैनिक | -- | २ | -- | -- | १ | -- | १ | १ | ५ | १० |
| | | | सर्वसाधारण | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | ३ | ५ | ११ |
| | ३) ड्रेस मेकिंग | **८** | महिला | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | | अपंग | -- | -- | -- | -- | १ | १ | -- | -- | -- | २ |
| | | | प्रकल्प/भुकंपग्रस्त | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ३ |
| | | | सर्वसाधारण | -- | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | ४) जनरल फिटर कम मेकॅनिक | **२** | माजी सैनिक | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | -- | २ |
| | ५) कर्तन व शिवण काम | **२५** | महिला | १ | २ | १ | -- | १ | १ | २ | २ | -- | १० |
| | | | अपंग | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | | | प्रकल्प/भुकंपग्रस्त | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | -- | -- | २ |
| | | | माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ३ | ५ |
| | | | सर्वसाधारण | १ | १ | १ | २ | १ | -- | -- | १ | -- | ७ |
| | ६) डेटा इन्ट्री ऑपरेटर | **७** | महिला | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ |
| | | | अपंग | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ |
| | | | प्रकल्प/भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | १ |
| | | | माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | | | सर्वसाधारण | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | ७) बांबु ॲण्ड केन वर्क | **१** | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | ८) जोडारी | **४** | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| | | | प्रकल्प/भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | | | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| | ९) संधाता | **६** | माजी सैनिक | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | ३ |
| | | | सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ३ |
| | १०) तारतंत्री | **१** | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | ११) हेअर अँड स्किन केअर | **२** | महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ |
| | १२) यांत्रिक मोटारगाडी | **६** | माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | | | सर्वसाधारण | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | १ | ५ |
| | १३) कोपा | **७** | महिला | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | १ | ३ |
| | | | अपंग | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |
| | १४) मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रीकल अँड इलेक्ट्रॉनिक्स | **५** | अपंग | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | | | माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | २ |
| | | | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| | १५) इंटीरिअर डेकोरेशन अँड डिझायनींग | **३** | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| | | | सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ |
| | १६) डेंटल लेबोरटरी टेक्नीशियन | **५** | सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ३ | ५ |
| | १७) फॅशन टेक्नॉलॉजी | **५** | महिला | १ | १ | | -- | -- | -- | -- | -- | १ | ३ |
| | | | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | -- | २ |
| | १८) प्रि प्रिपरेटरी स्कूल मॅनेजमेंट असिस्टंट | **१** | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | १९) मेकॅनिक जनरल इलेक्ट्रॉनिक्स | **२** | माजी सैनिक | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | २ |
| | २०) क्रेच मॅनेजमेंट | **१** | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| | २१) क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन | **१** | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| | | **१६१** | **एकूण** | **२२** | **१९** | **८** | **६** | **७** | **४** | **५** | **२९** | **६१** | **१६१** |

(२) **आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

| अ.क्र. | पदाचे नांव व ठोक वेतन | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| १. | प्रकल्प अधिकारी (रु.८०००/-) | अभियांत्रिकी / अभियांत्रिकीशी निगडीत तंत्र शास्त्र शाखेतील कमीत कमी द्वितीय श्रेणीतील पदवी किंवा पदविका किंवा समकक्ष अर्हता. व्यवस्थापनातील अर्हता असल्यास प्राधान्य | शासकीय अथवा शासन मान्य तंत्र संस्थेतील अथवा कारखान्यातील प्रशासकीय/तांत्रिक कामाचा अनुभव. पदवी करिता ४ वर्षे पदविकेकरिता ७ वर्षे |
| २. | अंश.सहाय्यक अधिव्याख्याता (रु. ४०००/-) | यंत्र/विद्युत अभियांत्रिकी/तंत्र शास्त्र शाखेतील कमीत कमी द्वितीय श्रेणीतील पदवी किंवा पदविका उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता. | संबंधित क्षेत्रातील तांत्रिक कामाचा / शिकविण्याचा अनुभव पदवीसाठी - १ वर्ष, पदविकेसाठी - २ वर्ष |
| ३. | गणित व चित्रकला निदेशक (रु.५५००/-) | अभियांत्रिकी / तंत्र शास्त्र शाखेतील द्वितीय श्रेणीतील पदवी किंवा अभियांत्रिकी / तंत्र शास्त्र पदविका द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता | शासकीय किंवा मान्यताप्राप्त संस्थेतील किंवा औद्योगिक आस्थापनेतील शिकविण्याचा/ पर्यवेक्षणाचा/तांत्रिक कामाचाा अनुभव पदवीसाठी - १ वर्ष पदविकेसाठी - २ वर्ष |
| ४. | शिल्प निदेशक (रु.५५००/-) | व्यवसायांशी संबंधित अभियांत्रिकी शाखेतील कमीत कमी द्वितीय श्रेणीतील पदवी किंवा पदविका किंवा त्याच व्यवसायातील समकक्ष अर्हता किंवा त्या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र परीक्षा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा त्या व्यवसायातील अखिल भारतीय व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण. प्रगत प्रशिक्षण संस्था परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य. | १) संबंधित क्षेत्रातील कामाचा / शिकविण्याचा आन्ुभव - प्रशिक्षणासह ४ वर्ष.२) ड्रायव्हर कम मेकॅनिक या शिल्प निदेशक पदासाठी जडवाहन चालविण्याचा परवाना आवश्यक आहे. |
| ५. | वरिष्ठ लिपीक तथा भांडारपाल (रु.४०००/-) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला/विज्ञान/ वाणिज्य शाखेतील पदवी कमीत कमी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता | शासकीय अथवा मान्यताप्राप्त संस्थेतील १ वर्षाचा लिपीक पदाचा अनुभव अथवा भांडारक्षेत्रातील किंवा शासकीय खात्यातील किंवा शासकीय मंडळाच्या उपक्रमातील प्रत्यक्ष भांडार पालनाचा कमीत कमी १ वर्षाचा अनुभव |

**(३) अर्ज**

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई-१.**

**आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरणांतर्गत कंत्राटी पध्दतीने पद भरती.**

**अर्जाचा नमुना**

१.अर्ज केलेल्या पदाचे नांव :-
२.उमेदवाराचे नांव :-
(आडनांव/नांव/वडील/पतीचे नांव)
३.उमेदवाराचा कायमचा पत्ता :-
४.उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता :-
५. जन्मतारीख व निर्देशित तारखेस वय :-
६.अर्जदार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी आहे काय
७.जातीचा प्रवर्ग (योग्य पर्यायावर अशी ✓ खूण करावी )
अ.जा.,अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड),विमाप्र, इमाव, खुला
८.समांतर आरक्षण :- (योग्य पर्यायावर ✓ अशी खूण करावी.)
(महिला/अपंग/माजी सैनिक / प्रकल्प / भूकंपग्रस्त / सर्वसाधारण )
९.शैक्षणिक पात्रता (शालांत परीक्षेपासून सुरुवात करुन कालानुक्रमे)

छायाचित्र राजपत्रित अधिका-याकडून साक्षांकित करणे आवश्यक राहील.

| अ.क्र. | उत्तीर्ण झालेली परीक्षा | विद्यापीठ/मंडळ संस्था | श्रेणी | टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय |
|---|---|---|---|---|---|---|

१०.अनुभवाचा तपशिल अनुक्रमे :-

| अ.क्र. | धारण केलेले पद | कार्यालय/आस्थापनेचे नांव | पासून | .पर्यन्त | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

११. या व्यतिरिक्त अधिकची माहिती द्यावयाची असल्यास प्रमाणपत्रासह द्यावी.
ठिकाण :-
तारीख :- ( उमेदवाराचे नांव व सही )

जोडावयाची सहपत्रे :-
**१.**शालांत परीक्षा प्रमाणपत्र किंवा वय व नागरिकत्वाचा दाखला. **२.**पदवी/पदविका प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका व आवश्यक तेथे शैक्षणिक पात्रतेचे इतर दाखले. **३.**मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र **४.** महाराष्ट्र राज्याचा अधिनिवासाचा दाखला. **५.**नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (इमाव / भज(क) / भज (ड) करिता ) **६.** विवाहीत महिलांचे नांव बदलले असल्यास त्यासंबंधीचा दाखला. **७.**विहित अनुभवासंबंधीची प्रमाणपत्रे. ८.स्वतःचा यपत्ता लिहीलेला लिफाफा. ९) इतर (काही असल्यास)

**टीप :- अर्जासोबत जोडलेल्या सहपत्रांची यादी व संख्या नमूद करावी.**

**(४) प्रवेश पत्र.**

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई-१.**

**आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरणांतर्गत कंत्राटी पध्दतीने पद भरती.**

१. उमेदवाराचे नांव :-
(आडनांव/नांव/वडील/पतीचे नांव)
२. उमेदवाराचा पत्ता :-
३. पदाचे नांव :-
४. प्रवर्ग :-
५. समांतर आरक्षण :-
६. बैठक क्रमांक :-
(कार्यालयामार्फत देण्यात येईल)
७. उमेदवाराची स्वाक्षरी

छायाचित्र राजपत्रित अधिका-याकडून साक्षांकित करणे आवश्यक राहील.

## (५) महत्वाच्या सूचना :-

**१.**एकूण पदसंख्या व आरक्षण यात बदल होऊ शकतो. **२.**ही पदे कंत्राटी पध्दतीने मासिकठोक वेतनावर भरण्यात येतील व निवड झालेल्या उमेदवारांना यासाठी २० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर आवश्यक ते करारपत्र भरुन द्यावे लागेल. **३.**नियुक्त उमेदवाराच्या कामाचे एक वर्षानंतर मुल्यांकन करण्यात येऊन त्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्याबाबतचा निर्णय हा संचालक (प्रशिक्षण) यांचा राहील. **४.**मागासवर्गाकरिता असलेले आरक्षण केवळ महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्यांसाठी व त्या वर्गापुरतेच राहील. **५.**भ.ज.(क), भ.ज.(ड) आणि इ.मा.व. उमेदवारांसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. **६.**महिलांचे आरक्षण,महिला व बालकल्याण विभाग शा.नि.क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/ का-२, दि.२५ मे,२००१ मधील तरतूदीनुसार राहील. **७.**अपंगांचे आरक्षण सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६ मार्च,१९९९ मधील तरतूदीनुसार राहील. **८.**माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील **९.** निवड झालेल्या उमेदवारांना राज्यातील आदिवासी भागामध्ये काम करावे लागेल व गरजेनुसार भविष्यात त्यांची राज्यातील आदिवासी भागात कोठेही बदली होऊ शकेल. **१०.** अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच जातीचा दाखला, नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.**११.**अनुभवाच्या बाबतीत तासिक तत्वावरील, अंशकालीन, शिकाऊ उमेदवार, अर्धवेळ, विनावेतन, अतिरिक्त कार्यभार, प्रभारी पदावरील अनुभव ग्राहय धरला जाणार नाही. **१२.**उपरोक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव न्युनतम अर्हता व अनुभव दर्शवितात. तथापि उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे उमेदवार प्राप्त झाल्यास त्यांचाही विचार केला जाईल.**१३.**वरिष्ठ लिपिक तथा भांडारपाल या पदाकरिता इंग्रजी व मराठी टंकलेखन तसेच एम.एस.सी.आय.टी. किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण झालेले असल्यास ती प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावी.**१४.**उमेदवारांनी सोबतच्या नमुन्यात (A४ size) अर्ज सादर करणे आवश्यक असून मागासवर्गीय उमेदवारांनी अर्जासोबत रु.१००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत रु.२००/-चा धनाकर्ष (**D.D.**) उमेदवार जिल्हास्तरावरील ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अर्ज सादर करणार आहे, त्या **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांच्या (Principal, Industrial Training Institute,--------)** यांचे नांवे काढून सोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत धनाकर्ष न जोडलेले अर्ज नाकारण्यात येतील. **१५.**उमेदवारांना एका पेक्षा जास्त पदासाठी अर्ज करण्याची इच्छा असल्यास त्यांना प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल.**१६.**अर्ज राज्यातील **सर्व जिल्हास्तरीय शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था** येथे स्विकारले जातील.(मुंबई शहर व उपनगरासाठी **औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंबई-११/ मुलुंड** येथे व रायगड जिल्हयासाठी **औद्योगिक प्रशिक्षण संस्था,पनवेल** येथे अर्ज स्विकारले जातील.) जिल्हास्तरीय औ.प्र.संस्था सोडून इतरत्र कोठेही अर्ज पाठविल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही. **१७.**अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक **१७/४/२००६** हा असेल. **१८.**टपाल खात्याची दिरंगाई व अन्य कोणतेही कारण असले तरीही, अर्ज स्विकारण्याबाबतची अंतिम तारीख काटेकोरपणे पाळण्यात येईल व उशीराने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. **१९.**अर्जाच्या बंद पाकिटावर --------- या पदाकरिता अर्ज असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. **२०.**अर्जासोबत स्वतःचा पत्ता लिहिलेले व रु.५/- ची पोस्टाची तिकीटे लावलेले २४ X १२ से.मी.आकाराचे दोन लिफाफे जोडणे आवश्यक आहे. **२१.** अर्जासोबत जाहिरातीमध्ये दिलेले प्रवेशपत्र राजपत्रित अधिकारी / एस.ई.एम. यांनी साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. **२२.**शासकीय / निमशासकीय स्थानिक स्तरावरील संस्थांतील उमेदवारांनी आपले अर्ज विहीत मार्गाने पाठवावेत. तथापि त्याची एक आगाऊ प्रत परस्पर विहीत मुदतीत पाठवावी. **२३.**खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा ३३ वर्ष तर मागासवर्गीयांसाठी ३८वर्ष अशी राहील. प्रकल्पग्रस्तांसाठी ४० वर्ष व अपंगांसाठी ४५वर्ष राहील. उमेदवाराची ही वयोमर्यादा दि.**०१ एप्रिल,२००६** रोजीची गणली जाईल. तथापि माजी सैनिकांसाठी त्या त्या शासन निर्णयान्वये मर्यादा शिथीलक्षम राहील.**२४.**एखाद्या उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.**२५.**सदर जाहिरातीत उल्लेख केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादी अटी व संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या किमान पात्रता जो उमेदवार धारण करीत असेल त्या सर्व उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. **२६.**पात्र उमेदवारांची यादी उमेदवाराने जिल्हास्तरीय ज्या संस्थेत अर्ज केला आहे, त्या जिल्हास्तरीय औ.प्र.संस्थेत नोटीस बोर्डवर दि.**१५/५/२००६** लावली जाणार आहे व ही यादी त्या विभागाच्या उपसंचालक कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर देखील लावली जाणार आहे. **२७.**एखादया उमेदवारास याबद्दल काही हरकत असल्यास त्यांना दि.**१७/५/२००६** पर्यन्त तसा लेखी अर्ज संबंधित जिल्हास्तरीय औ.प्र.संस्थेच्या प्राचार्याकडे सादर करावा.**२८.**उमेदवारांची यादी नोटीस बोर्डवर लावल्यानंतर संबंधित उमेदवाराला प्रत्यक्ष प्रवेशपत्र पोस्टाने पाठविले जाणार आहे. पोस्टाच्या दिरंगाईमुळे प्रवेशपत्र न मिळाल्यास संचालनालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. पोस्टामुळे प्रवेशपत्र न मिळाल्यास व पात्र यादीत उमेदवाराचे नांव असल्यास उमेदवाराने संबंधित प्रादेशिक कार्यालयाशी संपर्क साधून प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे.**२९.**लेखा परीक्षा दोन तासाची राहणार असून त्यामध्ये बहुपर्यायी प्रश्न राहणार आहे. त्यामध्ये कोणतेही निगेटीव्ह मार्कींग नाही. लेखी परीक्षा ही सामान्य ज्ञान, विभागाची माहिती, बुध्दीमत्ता चाचणी, विषयज्ञान व पदांच्या अनुषंगिक बाबी यावर होणार आहे.**३०.**लेखी परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | व्यवसायाचे नांव | दिनांक | वेळ | अ.क्र. | व्यवसायाचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्प अधिकारी | २९/५/२००६ | ८.००ते १०.०० | १४ | ड्रायव्हर कम मेकॅनिक | ३०/५/२००६ | ८.०० ते १०.०० |
| २ | अंशकालीन सहाय्यक अधिव्याख्याता | २९/५/२००६ | ११.०० ते १.०० | १५ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ३०/५/२००६ | ८.०० ते १०.०० |
| ३ | गणित/चित्रकला निदेशक | २९/५/२००६ | ३.०० ते ५.०० | १६ | जनरल फीटर कम मेकॅनिक | ३०/५/२००६ | ११.०० ते १.०० |
| ४ | ड्रेस मेकींग | २९/५/२००६ | ८.०० ते १० .०० | १७ | कोपा | ३०/५/२००६ | ११.०० ते १.०० |
| ५ | शिवण व कर्तन | २९/५/२००६ | ११.०० ते १.०० | १८ | मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रीकल ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स | ३०/५/२००६ | ११.०० ते १.०० |
| ६ | फॅशन टेक्नॉलॉजी | २९/५/२००६ | ३.०० ते ५.०० | १९ | इंटेरीयर डेकोरेटर | ३०/५/२००६ | ११.०० ते १.०० |
| ७ | डेंटल लॅब टेक्नीशियन | २९/५/२००६ | ११.०० ते १.०० | २० | फीटर | ३०/५/२००६ | ३.०० ते ५.०० |
| ८ | क्राफसमन फूड प्रॉडक्शन | २९/५/२००६ | ८.०० ते १०.०० | २१ | वायरमन | ३०/५/२००६ | ३.००ते ५.०० |
| ९ | क्रेच मॅनेजमेंट | २९/५/२००६ | ११.०० ते १.०० | २२ | मेकॅनिक जनरल इलेक्ट्रॉनिक्स | ३०/५/२००६ | ३.०० ते ५.०० |
| १० | प्रि प्रिपेरटरी स्कूल मॅनेजमेंट | २९/५/२००६ | ३.०० ते ५.०० | २३ | वेल्डर | ३१/५/२००६ | ८.०० ते १०.०० |
| ११ | बांबू ॲण्ड केन वर्क | २९/५/२००६ | ८.०० ते १०.०० | २४ | वरिष्ठ लिपिक तथा भांडारपाल | ३१/५/२००६ | ११.०० ते १.०० |
| १२ | हेअर ॲण्ड स्किन केअर | २९/५/२००६ | ११.०० ते १.०० | २५ | यांत्रिक मोटारगाडी | ३१/५/२००६ | ३.०० ते ५.०० |
| १३ | विजतंत्री | ३०/५/२००६ | ८.०० ते १०.०० | | | | |

वरीलप्रमाणे लेखी परीक्षेत प्राप्त गुणांची राज्यस्तरावर एकत्रित गुणवत्ता यादी केली जाणार आहे. १ पदास १० या प्रमाणे एकत्रित गुणवत्ता यादीतून उमेदवारांची प्रात्यक्षिक परीक्षा व मुलाखतीसाठी निवड केली जाणार आहे.**३१.**प्रात्यक्षिक परिक्षा व मुलाखतीसाठी निवड केलेल्या उमेदवारांची व्यवसायनिहाय यादी महाराष्ट्रातील सर्व जिल्हास्तरीय औ.प्र.संस्थांच्या नोटीस बोर्डवर व प्रादेशिक कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दि.**२६/६/२००६**रोजी लावली जाणारी आहे व उमेदवारास त्याबाबतचे प्रवेशपत्र दिले जाणार आहे. प्रात्यक्षिक परीक्षा ही तीन तासांची १०० गुणांची होणार आहे.**३२.**ज्या उमेदवाराची निवड प्रात्यक्षिक परीक्षेसाठी केली जाणार नाही त्यांना याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. **३३.** मुलाखत ही २५ गुणांची राहणार आहे.**३४.** उमेदवाराची प्रात्यक्षिक परीक्षा झाल्यानंतर त्याच दिवशी गुणवत्तेनुसार त्याची त्या संस्थेत मुलाखत घेतली जाईल व त्या संस्थेच्या नोटीस बोर्डवर, त्या पदाच्या सर्व उमेदवारांची मुलाखत झाल्यानंतर निवड यादी लावली जाईल.**३५.** उमेदवारांची एकत्रित गुणवत्ता यादी तयार करतांना लेखी परीक्षेत प्राप्त गुणाचे रुपांतर ३० गुणात केले जाणार आहे व प्रात्यक्षिक परीक्षेत प्राप्त गुणांचे रुपांतर हे ४५ गुणांत केले जाणार आहे व मुलाखतीसाठी २५ गुण या प्रमाणे तिन्हीची बेरीज करुन ज्यांना जसे गुण प्राप्त होतील त्याची निवड केली जाईल.**३६.** अंशकालीन सहाय्यक अधिव्याख्याता, गणित / चित्रकला निदेशक, वरिष्ठ लिपीक तथा भांडारपाल व प्रकल्प अधिकारी या पदांसाठी प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाणार नाही व त्याचेबाबत फक्त लेखी परीक्षेच्या गुणांचे रुपांतर ७५ गुणांत व मुलाखतीचे २५ गुण अशी एकत्रित गुणवत्तेनुसार निवड केली जाणार आहे. **३७.**उमेदवाराला लेखी परीक्षा , प्रात्यक्षिक परीक्षा व मुलाखतीसाठी दिलेल्या केंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल.

सही/-
( ज. द भुतांगे )
संचालक (प्रशिक्षण)